# पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे

दुरभाष-02562-288207 Email- sp.dhule@mahapolice.gov.in

**प्रेस नोट** **दिनांक** :- 31/10/2025

# ऑपरेशन ऑल आऊट

## आगामी निवडणुकीचे अनुषंगाने धुळे जिल्हा पोलीसांनी ऑपरेशन ऑल आऊट राबवुन असामाजिक घटकांवर केलेली कारवाई

मा.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक धुळे यांनी अपर पोलीस अधीक्षक श्री.अजय देवरे यांचे नियंत्रणात आगामी निवडणुकींचे अनुषंगाने धुळे जिल्हयात नाकाबंदी व ऑल आऊट ऑपरेशन राबवुन कारवाई करण्याकरीता धुळे जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सायबर पोलीस ठाणे व शहर वाहतुक शाखा यांना निर्देश दिले होते.

त्यानुसार दि.30/10/2025 रोजी 04.00 ते 22.00 वाजेपावेतो संपुर्ण धुळे जिल्हयात ऑपरेशन ऑल आऊट राबवून असामाजिक घटकांवर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | | संख्या |
|---|---|---|---|
| 1) | जप्त केलेल्या तलवारी व धारदार शस्त्र | :- | 02 तलवार<br>01 कोयता |
| 2) | अवैध हातभट्टी कारवाई | :- | 71 केसेस<br>71 आरोपी<br>10841 लिटर गावठी हातभट्टी दारु, रसायन वॉश व साहित्य<br>किंमत :- 11,99,180/- |
| 3) | देशी व विदेशी दारु विक्री | :- | 07 केसेस / 07 आरोपी<br>किंमत :- 6,000/-<br>देशी टँगो पंच, देशी संत्रा व देशी दारु वोडकाच्या 145 बाटल्या) |
| 4) | जुगार कायद्यान्वये दाखल केसेस | :- | 34 केसेस / 39 आरोपी<br>जप्त मुद्देमाल :- 32,149/- रु.किं.<br>रोख रक्कम व जुगाराची साधने |
| 5) | हरविलेल्या महिला व मुलींचा आणि पुरुष शोध | :- | 48 महिला व मुली<br>05 पुरुष |
| 6) | अपहरण केलेल्या मुली यांचा शोध | :- | 01 |
| 7) | पाहिजे आरोपी पकडले | :- | 02 (स्था.गु.शा.) |
| 8) | आक्षेपार्ह रिल्स बनविणाऱ्यांविरुध्द कारवाई | :- | 02 |
| 9) | महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 142 केसेस<br>तडीपार इसमावर केलेली कारवाई | :- | 02<br>स्थानिक गुन्हे शाखा, धुळे :- 01<br>धुळे शहर पोलीस ठाणे :- 01 |

| | | | |
|---|---|---|---|
| 10) | मोटार वाहन कायद्यान्वये केसेस व वसुल केलेली दंड रक्कम | :- | केसेस :- 849<br>दंड रक्कम :- 5,93,500/- रु. |
| 11) | ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह केसेस | :- | 11 केसेस |
| 12) | मद्य सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग करणाऱ्यांवर केलेली कारवाई | :- | 07 केसेस |
| 13) | पानटपरीवर अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर केलेली कारवाई | :- | 78 केसेस |
| 14) | वॉरंट बजावणी केली | :- | NBW वॉरंट :- 18<br>BW वॉरंट :- 23 |
| 15) | हिस्ट्रिशिटर व रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक केले | :- | 40 |
| 16) | बार, ढाबे, हॉटेल, लॉजेस व गेस्ट हाऊस यांची तपासणी केली | :- | 215 |
| 17) | OYO हॉटेल तपासणी | :- | 05 |
| 18) | दुचाकी व चारचाकी वाहने तपासणी | :- | 643 |
| 19) | नाकाबंदीचे एकुण ठिकाणे | :- | नाकाबंदी ठिकाणे :- 19 |

## हरविलेल्या महिला व मुलीं यांचा शोध

धुळे जिल्हयातुन हरविलेल्या महिला/मुली तसेच पुरुष यांचा शोध घेवुन, एकुण 48 महिला/मुली व 05 पुरुष यांचा शोध घेवून त्यांचे कुटूंबियांचे ताब्यात देण्यात आले आहे.

## अपहरण केलेल्या मुलींचा शोध

धुळे तालुका पोलीस ठाणे गु.र.नं.484/2023 भादंवि क.363, 370 या गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलगी व आरोपी यांचा अनैतिक मानवी व्यापार कक्ष, धुळे यांनी पलसाना ता.जि.सुरत (गुजरात राज्य) येथे शोध घेवून, पिडीत मुलीस त्यांचे कुटूंबियांचे ताब्यात देण्यात आले आहे. आरोपी विरुध्द पुढील कायदेशिर कारवाई करण्यात येत आहे.

## सायबर पोलीस ठाणे यांनी केलेली कारवाई

सायबर पोलीस ठाणे मार्फत सोशल मिडीयावर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे. या तपासणी दरम्यान समाजातील तेढ निर्माण करणारे, गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे तसेच आक्षेपार्ह स्वरुपाचे काही व्हिडीओ सोशल मिडीयावर पोस्ट केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर आक्षेपार्ह व्हिडीओ प्रसारीत करणारे एकुण 06 अकाऊंट शोधण्यात आलेले आहेत.

सदर व्हिडीओ मेटा कंपनीकडे डिलीट करण्यासाठी पाठविण्यात आले असुन, संबंधित 06 सोशल मिडीया अकाऊंट धारकांची माहिती मेटा कंपनीकडुन प्राप्त करुन त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येणार आहे.

सर्व नागरीकांना विनंती करण्यात येते की, सोशल मिडीयावर कोणत्याही प्रकारचे भडकाऊ, प्रक्षोभक, समाज विघातक किंवा आक्षेपार्ह पोस्ट शेअर करु नये. अशा कृतींवर कठोर कारवाई करण्यात येईल.

## इन्टाग्राम या सोशल मिडीयावर गुन्हेगारीचे उदात्तीकरण होईल अशी रिल तयार करणाऱ्यांवरील कारवाई

स्थानिक गुन्हे शाखा, धुळे मार्फत धुळे शहरातील इन्टाग्राम या सोशल मिडीयावर गुन्हेगारीचे उदात्तीकरण होईल अशा प्रकारची रिल तयार करणारे खालील तरुणांचा शोध घेवुन, त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी एक तरुण अल्पवयीन असल्याने त्याचे पालकांना समज देण्यात आली आहे.

1) राम गोरख जाधव, वय-21 वर्ष, रा.आण्णाभाऊ साठेनगर, फाशीपुल, धुळे
2) अल्पवयीन मुलाचे पालक श्री-जब्बार शाह रफीक शाह, वय-43 वर्ष, रा.इब्राहिम मशिद जवळ, शंभर फुटी रोड, धुळे

## शहर वाहतुक शाखा, धुळे यांनी केलेली कारवाई

ऑपरेशन ऑल आऊट दरम्यान शहर वाहतुक शाखा, धुळे यांनी मोटार व्हेईकल कायद्यान्वये एकुण 533 केसेस करुन, एकुण 3,95,400/- रु. दंड वसुल करण्यात आलेला आहे. त्यात लायसन्स जवळ न बाळगणे, रहदारीस अडथळा करणे, विना रिफ्लेक्टर/इशारा न पाळणे, फॅन्सी नंबर प्लेट, विना रिफ्लेक्टर वाहन चालविणे, अतिरिक्त प्रवासी वाहतुक करणे, मोबाईलवर संभाषण करणे, नो-एंन्ट्री मध्ये प्रवेश करणे, विना सिट बेल्ट वाहन चालविणे अशा केसेस करण्यात आलेल्या आहेत.

## पाहिजे आरोपी पकडले

धुळे तालुका व दोंडाईचा पोलीस ठाणेचे अभिलेखावर असलेले दोन वेगवेगळया गुन्हयातील पाहिजे आरोपी यांचा शोध घेवुन, त्यांना ताब्यात घेवुन संबंधित पोलीस ठाणेचे अभिलेखावरुन कमी करण्यात आला आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | कामगिरी |
|---|---|---|---|---|---|
| 1) | LCB (धुळे तालुका) | 67/2020 | भादंवि क.407, 411 | अफजल लयस मोहम्मद खान, रा.साबीरनगर, धुळे | LCB |
| 2) | LCB (दोंडाईचा) | 97/2024 | भादंवि क.143, 147, 148, 149 | पापा फरोज शहा, रा.दोंडाईचा ता.शिंदखेडा जि.धुळे | LCB |

## तडीपार इसम विना परवानगी प्रतिबंधित क्षेत्रात मिळुन आल्याने केलेली कारवाई

सक्षम अधिकारी यांचे विना परवानगी प्रतिबंधित क्षेत्रात संचार करतांना मिळुन आल्याने त्यांचेविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 142 प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

| क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | हद्दपार इसम नाव | कामगिरी |
|---|---|---|---|---|
| 1) | LCB (शिरपूर शहर) | 449/2025 | आनंद ऊर्फ वावडया दत्तात्रय पाटील, वय-36 वर्ष रा.बारी गल्ली, खालचे गाव शिरपूर | LCB |
| 2) | धुळे शहर | 358/2025 | मयुर ऊर्फ बबुआ सुरेश कंदारे, वय-32 वर्ष, रा.वाणी मंगल कार्यालय समोर, मिल परिसर धुळे | धुळे शहर |

## चोरीचे उद्देशाने अस्तित्व लपवून फिरणाऱ्यांवर केलेली कारवाई

सुर्यास्त ते सुर्योदया दरम्यान स्वत:चे अस्तित्व लपवुन चोरीचे उद्देशाने दबा धरुन बसलेले एकुण 07 संशयीतांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 122 प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | नाव |
|---|---|---|---|
| 1) | शिरपूर शहर | 500/2025 | भुऱ्या ऊर्फ दरबारसिंग कमलसिंग राजपुत, वय-33 वर्ष, रा.आमोदा ता.शिरपूर जि.धुळे |
| 2) | चाळीसगावरोड | 256/2025 | संजय मनोहर शिंदे, वय-48 वर्ष, रा.समतानगर, रेल्वेस्टेशन रोड, धुळे |
| 3) | चाळीसगावरोड | 257/2025 | फैजान ऊर्फ इन्या मुजमील अन्सारी, वय-21 वर्ष, रा.हाजी नगर, कबीर गंज, धुळे |
| 4) | धुळे शहर | 356/2025 | शाबीर शहा शब्बीर शहा, वय-42 वर्ष, रा.ऐंशी फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे |
| 5) | धुळे शहर | 257/2025 | मोईन खान फिरोज खान, वय-23 वर्ष, रा.जुने धुळे |
| 6) | दोंडाईचा | 269/2025 | जावीद नबी पिंजारी, वय-27 वर्ष, रा.अशोक नगर झोपड पट्टी, दोंडाईचा |
| 7) | दोंडाईचा | 270/2025 | खत्री ऊर्फ शहीद जावीद शहा, वय-28 वर्ष, रा.अशोक नगर झोपड पट्टी, दोंडाईचा |

## 02 तलवार व 01 कोयता जप्त

दहशत माजविण्याच्या उद्देशाने कब्जात तलवार बाळगणाऱ्या 02 आरोपींना ताब्यात घेवुन, त्यांचेकडुन एकुण 02 लोखंडी तलवार व 01 कोयता हस्तगत करुन, त्यांचेवर भारतीय हत्यार कायदा कलम 4/25 प्रमाणे खालील पोलीस ठाणेस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | आरोपीचे नाव व पत्ता | जप्त शस्त्र |
|---|---|---|---|---|
| 1) | धुळे शहर | 364/2025 | चंद्रकांत गजानन थोरात, वय-24 वर्ष, रंगारी चाळ, चितोडरोड, धुळे | तलवार-01<br>कोयता-01 |
| 2) | चाळीसगावरोड | 258/2025 | सोहेल आरीफ शाह, वय-20 वर्ष, रा.जनता सोसायटी, हजरत अली मशिदसमोर, धुळे | तलवार-01 |

## जुगार कायद्यान्वये केलेली कारवाई

धुळे जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे हद्दीत एकुण 39 आरोपीतांना जुगार खेळतांना ताब्यात घेवुन, त्यांचे कब्जातुन एकुण 32,249/- रु. किंमतीची रोख रक्कम व जुगाराची साधने जप्त करुन महाराष्ट्र जुगार कायदा कलम 12(अ) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| 1) | 34 गुन्हे | एकुण 39 आरोपी<br><br>महाराष्ट्र जुगार कायदा कलम 12(अ) प्रमाणे गुन्हे दाखल | 32,249/- रु.किं.<br>रोख रक्कम व जुगाराची साधने |

## गावठी हातभट्टी दारु वरील कारवाई

एकुण 71 आरोपीतांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात येवून, एकुण 11,99,180/- रु. किं.ची एकुण 10841 लिटर गावठी हातभट्टी दारु, रसायन, वॉश, ड्रम व गावठी दारु बनविण्यासाठीचे साहित्य हस्तगत करुन, गावठी दारु जागीच नाश करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| 1) | धुळे जिल्हयात एकुण 71 हातभट्टी ठिकाणांवर कारवाई करण्यात आली | एकुण 71 गुन्हे<br>आरोपी-71<br>महाराष्ट्र प्रोव्हीबिशन कायदा कलम 65(ई) प्रमाणे गुन्हे दाखल | 10841 लिटर गावठी दारु, रसायन वॉश व साहित्य<br>किंमत :- 11,99,180/- |

## बेकायदेशिर देशी व विदेशी दारु विक्रेत्यांवर केलेली कारवाई

विना परवाना बेकायदेशिररित्या देशी टँगो पंच, देशी संत्रा, देशी दारु वोडका विक्री करणाऱ्या 07 आरोपींचे कब्जातुन एकुण 6,000/- किंमतीची देशी दारुच्या एकुण 145 बाटल्या जप्त करण्यात येवून त्यांचेविरुध्द महाराष्ट्र प्रोव्हीबिशन कायदा कलम 65(ई) प्रमाणे धुळे जिल्हयातील विविध पोलीस ठाणेस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | गु.र.नं. | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|
| 1) | एकुण 07 गुन्हे<br>आरोपी-07<br>महाराष्ट्र प्रोव्हीबिशन कायदा कलम 65(ई) प्रमाणे गुन्हे दाखल | किंमत :- 6,000/-<br>देशी टँगो पंच, देशी संत्रा, देशी दारु वोडका |

## पानटपरीवर अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर केलेली कारवाई

एकुण 78 इसमांवर राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कायदा कलम 24 अन्वये केसेस करण्यात आलेल्या आहेत.

## मद्य सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग करणाऱ्यावरील कारवाई

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | आरोपीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|
| 1) | चाळीसगावरोड | 250/2025 | पृथ्वीराज ज्ञानदेव पाटील, वय-42 वर्ष, रा.राजाराम भाऊ नगर, मोहाडी ता.जि.धुळे |
| 2) | चाळीसगावरोड | 251/2025 | कुणाल दिपक शेलार, वय-31 वर्ष, रा.वरचे गाव, मोहाडी उपनगर, धुळे |
| 3) | चाळीसगावरोड | 252/2025 | रामराव धुडकू पाटील, वय-48 वर्ष, रा.वर्षावाडी मोहाडीनगर धुळे |
| 4) | चाळीसगावरोड | 253/2025 | सागर प्रदिप शिंदे, वय-34 वर्ष, रा.भटाई माता चौक, मोहाडी उप नगर, धुळे |
| 5) | चाळीसगावरोड | 254/2025 | शाहरुख शहाबुद्दीन मन्सुरी, वय-25 वर्ष, रा.सरदार हॉल |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | समोर, शंभर फुटी रोड, धुळे |
| 6) | चाळीसगावरोड | 255/2025 | शिक्गीर रमेश गोसावी, वय-39 वर्ष, रा.पिंपळादेवी नगर, मोहाडी उपनगर, धुळे |

वरील आरोपीं सार्वजनिक ठिकाणी दारुच्या नशेत फिरतांना आरडा-ओरड करुन सार्वजनिक शांततेचा भंग करतांना मिळुन आले म्हणुन त्यांचेविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम 85(1) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर ऑपरेशन ऑल आऊट व नाकाबंदी दरम्यान फरार व पाहिजे आरोपी अटक केले, तडीपार इसमांवर गुन्हे दाखल केले, अवैध शस्त्रांवर कारवाई केली, हरविलेल्या महिला/मुलींचा शोध, अपहरण झालेल्या मुलींचा शोध, अभिलेखावरील सराईत गुन्हेगार व हिस्ट्रिशिटर यांना चेक केले, हद्दीतील हॉटेल, लॉजेस, धाबे, OYO हॉटेल व गुन्हेगारी वस्त्या चेक केल्या, दुचाकी व चारचाकी वाहनांची तपासणी केली, मोटार व्हेईकल कायद्यान्वये केसेस करुन दंड वसुल करण्यात आला, सोडा विक्री गाडींवर दारु पितांना मिळुन आलेल्यांवर कारवाई केली, वॉरंटची बजावणी केली, आक्षपार्ह रिल्स बनविणाऱ्यावर कारवाई, अवैध धंदयांवर भरीव कामगिरी करण्यात आली आहे.

सदर ऑपरेशन ऑल आऊट व नाकाबंदी प्रभावी होण्याचे दृष्टीने पोलीस अधीक्षक, धुळे यांनी जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व शाखा अधिकारी यांना सुचना देवून पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक यांनी देखरेख करुन नाकाबंदी पॉईंट येथे भेट दिली आहे.

यापुढे देखील अशाचप्रकारे वेळोवेळी नाकाबंदी, कोंबींग व ऑपरेशन ऑल आऊट राबविण्यात येवून गुंडगिरी करणारे व टवाळखोर आणि असामाजिक घटकांवर प्रभावी कायदेशिर कारवाया करण्यात येणार आहेत.

श्रीकांत धिवरे (भापोसे)
पोलीस अधीक्षक, धुळे

**प्रति,**

मा.जिल्हा समिती व जनसंपर्क अधिकारी, धुळे
मा.संपादक / वार्ताहार / सर्व वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक मिडीया
2/- जनहितार्थ प्रसारणासाठी.